नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/०१/२०२५ (रविवार) दुपार

---

## नागपूर ग्रामीण हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर कार्यालय यांची कारवाई

दिनांक १८/०१/२०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर कार्यालय येथील स्टाफ पोस्टे बोरी हद्दीत पेट्रोलींग व जुगार रेडकामी फिरत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, मौजा होली क्रॉस शाळेजवळ बोरी येथे एक इसम सट्टापट्टीचे बोगस आकडयावर लोकांकडून पैसे व नंबरचा चिट्ठया स्विकारून हारजितचा जुगार खेळ खेळत आहे. अशा माहिती वरून रेड केली असता **आरोपी नामे– प्रतिक बाबाराव वाघमारे वय–१९ वर्षे रा सोनेगाव बेगडे ता चिमुर ह. मु सिडको कॉलनी बोरी** हा लोकांकडुन पैसे घेवुन कागदी चिट्ठ्यावर सट्टापट्ठीचे आकडे लिहुन कल्याण मटका नावाचा हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आला. आरोपीची झडती घेतली असता त्यांचे ताब्यातून १) वरली मटका सट्टापटटीचे आकडे मोड केलेल्या चिटठया असलेले २) पेन व नगदी रोख रक्कम ५६४०/–रूपये एकुण माल ५६४०/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर